# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१

Email id :- mscepune@gmail.com

फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७


जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/आ-३ (३८)२०२१/ 2418

दिनांक :- 24 /०८/२०२१

प्रति,

**शासनमान्य संस्थाचालक (सर्व)**
**महाराष्ट्र व गोवा**

**विषय :-माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर -२०२१ (प्रथम सत्र) मधील जीसीसी, जीसीसी-टिबीसी आणि जीसीसी-टिबीसी-एसएसडी परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती क्षमापित करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे पत्र जा. क्र. १९७१ दि.३०/०६/२०२१.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय दि. ०५ डिसेंबर २०१६.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये ऑक्टोंबर/नोव्हेंबर -२०२१ मध्ये प्रस्तावित जीसीसी, जीसीसी-टिबीसी आणि जीसीसी-टिबीसी-एसएसडी परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

संदर्भ क्र.१ नुसार प्रस्तावित परीक्षांसाठी प्रथम सत्र प्रवेशित विद्यार्थीची नोंदणी करुन घेण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.०२ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ ची सुधारीत नियमावली २०१६ चे प्रकरण २ चे नियम १३ (क) नुसार उमेदवाराला/ विद्यार्थ्याला परीक्षेकरीता अर्ज करताना पात्रतेसाठी एकुण कामाच्या दिवसांपैकी ८० % उपस्थिती पुर्ण असणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र वाणिज्य शिक्षण संस्था (टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टंकलेखन अभ्यासक्रम) मान्यता व संचालन नियम १९९१ ची सुधारीत नियमावली २०१६ चे प्रकरण १ मधील मुद्या क्र.११ (अ) (४) नुसार मी आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे माझ्या अधिकाराच्या अनुषंगाने कोविड - १९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर उपरोक्त अडचण लक्षात घेता ऑक्टोंबर/नोव्हेंबर -२०२१ (प्रथम सत्र) मध्ये प्रस्तावित परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती ४०% असल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी देत आहे. जेणेकरून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी संधी मिळेल. त्यानुसार योग्य ती कार्यवाही सर्व संबंधितांनी करावी.

(तुकाराम सुपे)
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:

१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).
३) शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उ/द/प).